**वादीतर्फे सा.क्र. १ चा सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एम. डी. काकाणी यांच्यामार्फत शपथेवर सुरू-:-**

१. माझे शपथपत्र नि.क्र. ६४ मधील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे व तो वाचून मी त्यावर स्वाक्षरी केली आहे.

२. मी शपथपत्रासह खालील कागदपत्रे दाखल केलेले आहेत.

१. गट क्र. ३२५/१ च्या ७/१२ च्या प्रमाणित प्रत **नि.क्र.६९**

२. फेरफार क्र. ५२२५ ची प्रमाणित प्रत **नि.क्र. ७०**

३. फेरफार क्र. ४८० ची प्रमाणित प्रत **नि.क्र. ७१**

४. फेरफार क्र. ४९१ ची प्रमाणित प्रत **नि.क्र. ७२**

५. मंडळाधिकारी यांचा दि. १०/०७/२०२५ रोजीच्या आदेशाची मुळ प्रत **नि.क्र. ७३**

६. आरटीएस अपील क्र. ९०/२०१६ मधील आदेशाची प्रमाणित प्रत **नि.क्र.७४**

७. मंडळाधिकारी यांचा दि. १७/०४/२०१७ रोजीच्या आदेशाची प्रमाणित प्रत **नि.क्र. ७५**

८. आरटीएस अपील क्र. १८८/२०१८ मधील आदेशाची प्रमाणित प्रत **नि.क्र.७६**

९. दि. १८/०५/२०१६ रोजी उप कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या. बाभळेश्वर यांच्या पत्राची मुळ प्रत **नि.क्र. ७७**

१०. गट क्र. ८७२ च्या९/३/९/४ चा स्किम उतारा नि.क्र. ७८

सरतपास पुर्ण.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एम. बी. शेळके यांच्यामार्फत :-**

३. मला प्रतिवादी गोविंद व बाबुलाल अशी दोन भाऊ तर एक बहीण नामे लताबाई आहे. गट क्र. ३२५ चे संपुर्ण क्षेत्रफळ ३० एकर असे होते. सदर गट क्र. ३२५ माझे वडील रतनलाल यांच्या नावे होता. वादग्रस्त मिळकत ही आमची वडिलोपार्जित मिळकत आहे.

सन १९७०-७२ साली माझ्या वडिलांच्या नावे कमाल जमीन धारक कायद्याअंतर्गत अधिकची जमीन होती याबद्दल मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांच्या नावे असलेली अतिरिक्त जमीन ही सिलिंग कायद्याअंतर्गत सरकार जमा होवू नये म्हणून १९७५ साली माझ्या वडिलांनी सगळयांच्या नावे जमीन वाटप केली. आमचे वाटप झाले त्यावेळेस मी अज्ञान होतो व माझी आई ही अपाक दर्शवण्यात आली होती. वाटपाच्या वेळी मी १० वर्षांचा होतो. तर प्रतिवादी गोविंद यास अपाक म्हणून वडील दर्शवण्यात आले होते. वाटपाच्या वेळी प्रतिवादी हा १२ वर्षांचा होता. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यात वाटप जरी त्यावेळी झाले असले तरी माझे वडीलच सदर जमीन पाहत होते. बाबुलाल रतनलाल यांच्या नावची जमीन सोडून इतर सर्व जमीन माझे वडील पाहत होते. माझे वडील ज्यावेळी जमीन पाहत होते त्यावेळेस त्या जमीनीस पाटपाण्याचे व तीन विहिरींचे पाणी होते. मी सज्ञान होईपर्यंत आमच्या जमिनी वडील पाहत होते. तोपर्यंत माझे वडील आमच्या वडिल तीनही विहिरींचे पाणी वापरत असल्याबाबत मला सांगता येत नाही. मी सज्ञान होईपर्यंत शेती व विहिरी याबाबत पाहत नव्हतो.

प्रश्न - गट क्र. ३२५/१ मधील विहीर तुम्हाला कोणत्या वाटपाने दिली ?

उत्तर - मला सुरूवातीच्याच वाटपामध्ये गट क्र. ३२५/१ मधील विहीर दिली.

मला सुरूवातीच्या वाटपात गट क्र. ३२५/१ मधील विहीर दिली याबाबत मी मुळा प्रवरा विज कनेक्शनचा कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

प्रश्न - गट क्र. ३२५/१ मधील विहिर तुम्हाला दिली याबाबत तुमच्याकडे कागदोपत्री पुरावा आहे काय ?

उत्तर - ७/१२ उता-यावर नोंद आहे.

हे म्हणणे खरे नाही की, मला गट क्र. ३२५/१ मधील विहीर कुठल्याही वाटपाने मिळालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या वडिलोपार्जित तीन विहिरींचे वाटपच झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ कुटुंब व्यवस्थापनाकरिता गट क्र. ३२५/१ मधील विहिरीचे विद्युत कनेक्शन माझ्या नावे आले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर विद्युत कनेक्शन

घेतल्यापासुन गट क्र. ३२५ पासून सर्व पाणी घेत होते.

४. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील रतनलाल यांनी त्यांच्या गट क्र. ३२५ मधील मिळकतीपैकी काही क्षेत्र माझी आई ताराबाई यांना मालकिहक्काने दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांच्या नावे गट क्र. ३२५ मधील मिळकतीपैकी आईच्या नावाने दिलेले क्षेत्र याची वहिती माझी आई ताराबाई हिच करित होते. सन १९९३ साली माझे वडील रतनलाल मयत झाले. माझे वडील मयत झाले त्यावेळेस गट क्र. ३२५ मधील त्यांची जमीन आईच्या नावे होती परंतु मीच त्याची वहिती करत होतो. माझ्या दावा परिच्छेद क्र. ५ मध्ये ''दि. २५/१२/१९८० रोजी वादी क्र. १ व प्रतिवादीचे वडील मयत रतनलाल यांनी त्यांच्या हयातीत त्यांच्या नावावरील एकुण ३ हेक्टर ६ आर क्षेत्रापैकी १ हेक्टर ५३ आर क्षेत्र धर्मपत्नी ताराबाई यांच्या नावे मालकिहक्काने केलेली होती व आहे. त्याप्रमाणे फेर क्र. १०४८ अन्व्ये गावाच्या दप्तरी नोंद आहे'' ही बाब नमुद असून ती प्रिंट मिस्टेक आहे.

५. तसेच मी माझ्या दाव्यासोबत माझे शपथपत्रही दाखल केलेले होते.

प्रश्न - सदरचे शपथपत्र तुम्ही वाचून दाखल केले होते का ?

उत्तर - दावा व शपथपत्र दोन्ही मध्ये नजरचुकिने नमुद झाले आहे.

हे म्हणणे खरे नाही की, माझ्यादाव्यातील परिच्छेद क्र.५ मधील मजकुर नजरचुकिने नमुद झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यादाव्यातील परिच्छेद क्र. ५ मधील मजकुर नजरचुकिने नमुद असल्याचे कारण की माझ्या दाव्याला अडथळा होईल.

प्रश्न - ताराबाईच्या नावची जमीन प्रतिवादी क्र. १ याने दि. ०२/०३/२०१५ रोजी विकत घेतली ?

उत्तर - प्रतिवादी क्र. १ याने प्रस्तुतची जमीन अवैध मार्गाने विकत घेतली.

**(सदर साक्षीदार हा प्रत्येक प्रश्नास स्पष्टीकरणासहीत स्वत:चे उत्तर देत आहे.)**

(पुरूषोत्तम वि. गोविंद)

हे म्हणणे खरे नाही की, ताराबाई यांच्याकडुन प्रतिवादी क्र. १ याने घेतलेली जमीन तो करतो. सदर जमीन कोण करतो याबद्दल मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ हा गट क्र. ३२५/१ मधील विहिरीचे पाणी ताराबाई यांच्याकडून घेतलेल्या जमिनीकरिता वापरतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ हा ३२५/१ मधील असलेल्या विहिरीत त्याच्या हक्काचे पाणी वापरतो.

५. गट क्र. ३२५/१ हा माझ्या नावे होता व गट क्र. ३२५/२ हा प्रतिवादी क्र. १ च्या नावे होता. १९९२ साली सदर गट क्र. ३२५/१ व ३२५/२ चे कुटुंब व्यवस्थापन म्हणून वाटप केले व त्याचा फेर ४८० अन्वये लागला. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ३२५ चे आमच्या कुटुंबात कधीही वाटप झालेले नसुन केवळ कुटुंब व्यवस्थापनाकरिता प्रत्येकाच्या नावे जमीन करण्यात आल्या. प्रतिवादीने मला अनेकवेळा अडथळा केला मी त्याची निश्चित तारीख, वार, महिना, वर्ष सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने मला कधीही विहीरीतुन पाणी घेण्यासाठी कधीही अडथळा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी याने मला कधीही त्याच्यानावे गट क्र. ३२५/१ मधील विहिरीवर मोटार कनेक्शन घेण्याचे म्हंटले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गट क्र. ३२५/१ चा स्वतंत्र मालक नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी याने आई ताराबाई यांची जमीन विकत घेतली याचा मला राग होता म्हणून मी त्याला वाद मिळकतीतील विहिरीतुन पाणी घेण्यास मनाई व्हावी म्हणून प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

MAYUR EKNATHRAO PAWAR

Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2025.12.18 14:56:29 +0530

(मयुर ए. पवार)

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

ता. राहुरी, जि. अहमदनगर.

दिनांक:-१८/१२/२०२५.